डॉ. मनोज माळी, डॉ. सचिन महाजन,
डॉ. हर्षवर्धन मरकड

# हळद पिकातील प्रमुख किडींचे नियंत्रण

सध्या हळद पिकामध्ये किडींच्या प्रादुर्भाव होण्यास पोषक स्थिती आहे. या काळात किडींचा प्रादुर्भाव झाल्यास हळद पिकावर अनिष्ट परिणाम होतो. त्याचा थेट संबंध उत्पन्न आणि कंदाचा दर्जा यांच्याशी येतो. त्यामुळे हळद पिकात किडींपासून वेळीच नियंत्रण करणे गरजेचे आहे.

सद्यःस्थितीत हळद लागवड पूर्ण होऊन चार ते पाच महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे. या कालावधीत हळदीची वाढ, आणि फुटव्यांची वाढ होण्यास सुरुवात होते. मागील काही दिवसांत राज्यात झालेल्या दमदार पावसाने बहुतांश ठिकाणी पिकात पाणी साचून राहिल्याची स्थिती होती. त्यासाठी पिकांत साचलेल्या पावसाच्या पाण्याचा त्वरित निचरा करून घ्यावा. मागील आठवडाभरापासून पावसाने विश्रांती घेतलेली आहे. सद्यःस्थितीत ढगाळ हवामान, तापमानातील चढ-उतार, आर्द्रता यामुळे हळद पिकांतील कीड-रोगांचा प्रादुर्भाव होण्यास पोषक हवामान स्थिती निर्माण झाली आहे. हळद पिकामध्ये उत्पन्नाचा मुख्य स्रोत हा जमिनीत वाढणारे कंद आहेत. हळद पिकावर कीड-रोगांच्या प्रादुर्भाव झाल्यामुळे त्याचा थेट परिणाम कंदाच्या दर्जावर होतो. त्यासाठी पिकाचे नियमित निरिक्षण करून त्वरित उपाययोजना कराव्यात जेणेकरून संभाव्य नुकसान टाळले जाईल.

## कंदमाशी

**प्रादुर्भावाची अवस्था :** अळी

### ओळख

- हळद पिकावर नुकसान करणारी ही प्रमुख कीड आहे. कंदमाशीचे जीवनचक्र चार आठवड्यांत पूर्ण होते.
- कंदमाशी डासासारखी पण आकाराने मोठी व काळसर असते. पाय शरीरापेक्षा लांब असतात. पायाची पुढील टोके पांढऱ्या रंगाची असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून, त्यावर राखाडी रंगाचे दोन ठिपके असतात.
- अळी पिवळसर असून तिला पाय नसतात.
- कंदमाशी खोडाच्या बुंध्याजवळ किंवा उघड्या कंदावर अंडी घालते. अंड्यातून ५ ते ७ दिवसांत लालसर अळी बाहेर पडून ती उपजीविकेसाठी कंदात शिरतात.

### नुकसानीचा प्रकार

- कंदामध्ये अळ्यांचा शिरकाव झाल्याने तेथे रोगकारक बुरशी तसेच सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊन कंद मऊ होतात. कंदांना पाणी सुटून ते कुजू लागतात.
- लांबलेला पावसाळा कंदमाशीसाठी अधिक अनुकूल असतो.
- या किडीमुळे हळद पिकाचे सुमारे ४५ ते ५० टक्के पर्यंत नुकसान होते.
- ही कीड सप्टेंबर महिन्यापासून पीक काढणीपर्यंत नुकसान करते.

### नियंत्रण

- शेतातील पीक अवशेष, सडके कंद नष्ट करावेत.
- उघडे पडलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. शिफारशीत केलेल्या वेळेवर हळदीची भरणी करावी.
- हळदीनंतर पुन्हा हळद किंवा आले यासारखी पिके सलग त्याच क्षेत्रामध्ये घेऊ नयेत. पीक फेरपालट करावी.
- हेक्टरी ६ पसरट भांडी (माती अथवा प्लॅस्टिकची) वापरून प्रत्येक भांड्यात भरडलेले एरंडीचे बी २०० ग्रॅम घेऊन त्यात १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणामध्ये तयार होणाऱ्या विशिष्ट गंधाकडे कंदमाशा आकर्षित होतात. त्यात पडून मरू लागतात. ही उपाययोजना अत्यंत प्रभावी, कमी खर्चिक व सहजरीत्या करण्यासारखी आहे. तसेच कंदांचे नुकसान करण्याअगोदरच कंदमाश्या नियंत्रित होत असल्याने विशेष प्रभावी उपाययोजना आहे. सेंद्रिय हळद उत्पादनामध्येही ही महत्त्वाची आहे. (अॅग्रेस्को शिफारस)

**रासायनिक फवारणी :** (प्रति लिटर पाणी)

क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २ मिलि याप्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने गरजेनुसार फवारणी करावी

(अॅग्रेस्को शिफारस)




हळद पिकातील कंदमाशी व त्यामुळे झालेले नुकसान.



पाने खाणारी अळी अशाप्रकारे हळदीच्या पानांवर एका सरळ रेषेत छिद्रे करते.

## पाने खाणारी अळी

**प्रादुर्भावाची अवस्था :** अळी

### नुकसान प्रकार

- पावसाळ्यात वाढलेल्या आर्द्रतेमुळे या किडीचा प्रादुर्भाव दिसू लागतो.
- पाने सुरळी किंवा पोंगा अवस्थेत असताना ही अळी पानावर उपजीविका करते.
- पान खाऊन सुरळीमध्ये छिद्र करते. सुरळीतील पान पूर्णपणे उलगडल्यानंतर एका सरळ रेषेमध्ये पानांवर छिद्रे आढळून येतात.

### नियंत्रण

- गुंडाळलेली पाने तसेच अळी व कोष वेचून नष्ट करावेत.

**रासायनिक फवारणी :** प्रतिलिटर पाणी

- क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २ मिलि

(अॅग्रेस्को शिफारस)

- डॉ. मनोज माळी, ९४०३७ ७३६१४
डॉ. सचिन महाजन (रोगशास्त्रज्ञ) ९४२११ २८३३३
(लेखक हळद संशोधन योजना, कसबे डिग्रज, जि. सांगली येथे कार्यरत आहेत.)

• कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉइंट अॅग्रेस्कोप्राप्त आहेत. • फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे. • खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे. • बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे. • लेबल क्लेम वाचावेत. • पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत. • रसायनांचा गट तपासावा. • पीएचआय, एमआरएल तपासावेत. • पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.

• मधमाशी, मित्रकीटकांना हानिकारक कीडनाशकांचा वापर टाळावा. • पीक फुलोरा अवस्था लक्षात घेऊन कीडनाशकांचा समंजस वापर करावा.

छोट्या जाहिराती

क्लासिफाइड: सहा ओळींसाठी किमान ५०० रुपये, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-
विशेष योजना: २ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १० पेड + १२ फ्री

शेतीविषयक अन्य विषय

शेतीसाहित्य

मल्चिंग पेपर (रेडीमेड होल). रेडीमेड होल असणारे मल्चिंग पेपर सर्व साईज मध्ये मिळेल (एस. टी पार्सलची सोय) ड्रीप सबमेन साठी पी.व्ही.सी पेक्षा स्वस्त एच.डी.पी.ई पाईप (२ वर्ष गॅरंटीसह) मिळेल. रेनपाईप, एच.डी.पी.ई पाईप, मल्चिंग पेपर डिलरशिप देणे आहे. संपर्क : पल्लवी ठिबक सिंचन, फोन. ९७६४२७८८८६,

बी - बियाणे

बियाणे / रोपे विक्री

खात्रीशीर ओडिशी शेवगा बियाणे मिळेल. बारामाही फुलांचा बहर व शेंगा येतात. सिड्स दर 2000 रु किलो (घरपोच मिळेल) अधिक माहितीसाठी संपर्क 962 3679551 / 9307084945

पशुधन व्यवसाय